क्र.महसुल/जमीनबाब/सनद/एसआर- ०३/२०२२ दिनांक ८/०८/२०२२

===========================================================

वाचले :-

१) महसुल व वनविभाग यांचेकडील शासन परिपत्रक क्रमांक एनएपी-२०२१/प्र.क्र.११८/ज-१ अ, दिनांक १३ एप्रिल, २०२२

२) श्रीम.रत्नप्रभा हरिभाऊ कोर यांनी सिध्दीदाता हॉस्पिटॅलीटी प्रा.लि. तर्फे डायरेक्टर श्री.संदिप परशुराम साळवी रा.ठाणे यांचा दिनांक २१/०७/२०२२ रोजीचा अर्ज.

४) अर्जदार यांचे दि. ४/०८/२०२२ रोजीचे बंधपत्र/सत्यप्रतिज्ञापत्र.

५)मुख्याधिकारी नगरपंचायत मुरबाड यांचेकडील पत्र क्र.बांध.जा.नं.११२/२०२२ दि.२०/०७/२०२२ रोजीचे पत्र.

६)रुपांतरीत कर व अकृषिक कराची रक्कम दिनांक ८/०८/२०२२ रोजी शासन जमा केलेबाबत चलनाची प्रत.

७) कार्यालयीन मंजुर टिप्पणी दिनांक : ५/०८/२०२२

===========================================================

**परिशिष्ट"अ"**

**महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ४२ब/ ४२/क/ ४२ ड मधील तरतुदींन्वये भोगवटादास द्यावयाची सनद (अकृषिक वापराची परवानगी )**

ज्याअर्थी, श्रीम.रत्नप्रभा हरिभाऊ कोर यांनी सिध्दीदाता हॉस्पिटॅलीटी प्रा.लि. तर्फे डायरेक्टर श्री.संदिप परशुराम साळवी रा.ठाणे या जमीन धारकाने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ४२क च्या तरतुदीन्वये, जमीन सर्व्हे क्र.२०/१ एकुण क्षेत्र १०४०.०० चौ.मी. व सर्व्हे क्र.२०/३ एकुण क्षेत्र १७९०.०० चौ.मी.गाव मुरबाड तालुका मुरबाड, जिल्हा ठाणे या जमीनीवर रहिवास या अकृषिक प्रयोजनार्थ वापरापोटी रुपांतरीत कराची र.रु.५६६०/- चलन क्र.GRNMH006178192202223M व अकृषिक आकारणीची र.रु.१०१८८/-चलन क्र. GRNMH006178192202223M अन्वये दि.८/०८/२०२२ रोजी भरणा केली आहे.

त्याअर्थीआता, उक्त संहितेमधील तरतुदीच्या नियमांच्या आणि खालील शर्तीना अधिन राहून उपरोक्त जमीनीच्या धारकास सदर जमीनीवर, उक्त नमूद करण्यात आलेला अकृषिक वापर अनुज्ञेय करण्यात आल्याचे मानण्यात आल्याने उक्त संहितेच्या कलम ४२ क अन्वये सनद देण्यात येत आहे.

१. वरीलप्रमाणे अनुज्ञेय केलेल्या अकृषिक वापरामध्ये नियोजन प्राधिकरणाच्या पूर्व मंजूरीशिवाय कोणताही बदल करता येणार नाही.

२. जमीनीवर प्रत्यक्ष विकास अथवा बांधकाम सुरु करण्यापूर्वी सक्षम नियोजन प्राधिकरणाची विकास परवानगी घेणे आवश्यक राहील.

३. मा.जिल्हाधिकारी/ नियोजन प्राधिकरणयांच्या मान्यतेने रेखांकन मंजूर केल्याशिवाय क्षेत्राची पोटविभागणी करता येणार नाही अथवा छोटे भूखंड करुन विक्री करता येणार नाही.

४. नियोजन प्राधिकरणाच्या मान्यतेने सदर जमिनीच्या वापरामध्ये किंवा वापराच्या क्षेत्रामध्ये कोणताही बदल झाल्यास, त्याची माहिती अशा मंजूरीपासून ३० दिवसांच्या आत मा.जिल्हाधिकारी यांना देणे बंधनकारक राहील.

५. अकृषिक वापर अनुज्ञेय करण्याच्या या सनदेव्यतिरिक्त वित्तीय संस्था/ नियोजन प्राधिकरण यांनी इतर कोणत्याही स्वरुपातील बिनशेती आदेशाची मागणी करु नये.

**मंजूर टिपणीनुसार**

तहसिलदार, मुरबाड
जिल्हा. ठाणे.

(संदीप आवारी)
तहसीलदार मुरबाड

प्रत:- १) मंडळ अधिकारी, मुरबाड यांचेकडे माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.
२) तलाठी साझा, मुरबाड यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.
३) श्रीम.रत्नप्रभा हरिभाऊ कोर यांनी सिध्दीदाता हॉस्पिटॅलीटी प्रा.लि. तर्फे डायरेक्टर श्री.संदिप परशुराम साळवी रा.ठाणे